पोलीस उप आयुक्त(प्रकटीकरण),

गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

-: प्रेस नोट :- **दि. ३१/१०/२०२६**

गुन्हे शाखा कक्ष ४, मुंबई कडील गु.र.क्र. ४७/२०१८ या गुन्हयातील खंडणीकरीता अपहरण केलेल्या आरोपी यांना दोषसिध्दी झालेबाबत.

दिनांक ०३/०८/२०१८ रोजी यातील बळीत मुलगा वय १३ वर्षे हा बाहेरून घरी एकटाच येत असताना त्याचे अज्ञात इसमांनी अपहरण केले म्हणून विनोबा भावे नगर पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रारी वरून गु.र.क्र. २२३/२०१८ कलम ३६३ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. नमुद गुन्हा अत्यंत संवेदनशिल असल्याने सदरचा गुन्हा गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ४, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला होता. त्यांनतर सदर गुन्हयाची गुन्हे शाखेमध्ये गु.प्र.शा., गु.र.क्र. ४७/२०१८ अन्वये पुर्ननोंद करून तपासावर घेण्यात आला. सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान दिनांक ०६/०८/२०१८ रोजी ०५ आरोपीतांना ताब्यात घेवून अपहृत मुलाची सुटका करण्यात आली. त्यानंतर नमुद आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा प्राप्त करुन गुन्हयाच्या तपासाअंती कलम ३६३, ३६४(अ), ३२८, ३६५, ३२४, ३४३, ५०६, १२०(ब) सह ३४ भा.द.वि. सह ३७(१) म.पो.का. अन्वये मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.

सदर गुन्हयामध्ये दिनांक ३०/१०/२०२६ रोजी नमुद आरोपीतांना भा.दं.वि. कलम ३२८ प्रमाणे ३ वर्षे, कलम ३६३ प्रमाणे २ वर्षे, कलम ३२४ प्रमाणे २ वर्ष, कलम ३४३ प्रमाणे १ वर्ष आणि रू. ३५००/- दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्ण कान्त उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी-मध्य श्री. सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्र.पो.नि. नितीन कुंभार, स.पो.नि. अजय बिराजदार, कोर्ट पैरवी म.पो.शि.क्र. ०९१५४७/सुरेखा पाटील यांनी पार पाडलेली आहे.